क्र.२/नसवि/महासभा/ ०४ /२०१२-२०१३
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०४ जूलै, २०१२

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०४ /२०१२-२०१३

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक १२/०७/२०१२ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील दि.१२/०६/२०१२ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
   अ) दु:खवठ्याचे ठराव.
   ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिकेच्या मिरज शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजना / महानगरपालिकेच्या प्रारुप विका योजना आणि भागश: अंतीम मंजूर विकास योजनेनुसार गांधी चौक ते शास्त्री चौक, विद्यमान शिवाजी रोड २४.४८ मी. रस्ता रुंदीकरणाने प्रस्तावीत आहे. सदर रस्त्यापैकी हिरा हॉटेल चौक ते गांधी चौक रस्ता रुंदीकरण प्रस्ताव अंमलबजावणीचे काम हाती घेण्यात आलेले आहे. सदर रस्त्याने बाधीत पश्चिम बाजूकडील बहुतांश मिळकतधारकाने रस्ता रुंदीने बाधीत क्षेत्राची कब्जेपट्टी चटई क्षेत्र निर्देशांक / विकसन हक्क घेणेचे अटीवर महानगरपालिकेस करुन दिलेली आहे. त्यानुसार जागेवर विद्यमान बांधकाम , कुंपन भिंतीचे बांधकाम काढून घेणेत आलेले आहे. सदर रस्त्यापैकी अंतीम भूखंड ४२/३९ ही मिळकत जिल्हा परिषद सांगली यांचे मालकीची असून, सदर मिळकती पैकी रस्ता रुंदीने बांधीत २७६.१८ चौ.मी. क्षेत्रासाठी रु.१०,०८,०५७/- आणि त्यामधील विद्यमान छ.शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा , कुंपन भिंती , सायकल स्टँड, वॉचमन रुम इ. बाधीत क्षेत्रासाठी रुपये ८,५०,०००/- अशी एकूण नुकसान भरपाई रु.१८,५८,०५७/- मिळणे बाबत महानगरपालिकेस कळविले आहे. सन २०११ च्या बाजारमुल्य दर तक्त्यानुसार अंतीम भूखंड क्र.४२ पैकी चक्कर सडकेस सन्मुख असलेला भाग या मुल्य दर विभागातील (१९/१५७) खुल्या जमिनीचा प्रति चौ.मी. दर ३,६५०/- प्रमाणे खुल्या जागेचा दर आहे. त्यानुसार रस्ता रुंदीने बाधीत निव्वळ भुखंडासाठी व बांधकामासाठी नुकसान भरपाई रक्कम खाजगी वाटाघाटीने रस्ता क्षेत्र व बांधीव क्षेत्र भूसंपादन व नुकसान भरपाई आदा करणेस धोरणात्मक मान्यता देणे बाबत **उपायुक्त (नगररचना मिरज) यांचे दि.२९/०६/२०१२ रोजीचे विषपत्र.**

५. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) (कक) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेल्या सुचनेनुसार मंजूर विकास योजना , मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील फेरबदलाचा प्रस्ताव राज्यातील महानगरपालिकांच्या विकास नियंत्रण नियमावलीत आर्थिक दृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न गटाच्या घरबांधणीसाठी करावायाच्या तरतूदीबाबत महासभेचे मत व अहवाल मा.शासनाकडे सादर करण्यास धोरणात्मक मान्यता देणे बाबत **उपायुक्त (सहा.संचालक नगररचना) यांचे दि.०५/०६/२०१२ रोजीचे विषयपत्र.**

६. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

७. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १२/०७/२०१२

ठराव क्रमांक :- ५८

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण महासभा दि.१२/०६/२०१२ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.३५ ते ठराव क्र.५७ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

कार्यवृत्त सर्वानुमते मंजुर

महापौर,

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १२/०७/२०१२

ठराव क्रमांक :- ५८

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

भारतीय कुस्तीचे महामेरु व जेष्ठ अभिनेते रुस्तम-ए-हिंद कै.दारासिंह यांचे गुरुवार दि.१२/०७/२०१२ रोजी दिर्घ आजाराने मुंबई येथे त्यांचे रहाते घरी निधन झाले. ते ८४ वर्षाचे होते. तमाम भारतातील कुस्तीगिरांचे आदर्श असणारे कै.दारासिंह यांचे निधनामुळे अन्य रसिक अभिनेते शोकसागरात बुडाले त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्गती देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.युवराज सतिश बावडेकर

अनुमोदक :- मा.संतोष विठ्ठल देवळेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रभारी आयुक्त

नगर सचिव,
सांगली मिरज आ.ण कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १२/०७/२०१२

ठराव क्रमांक :- ६०

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

मिरजेचे सरकार श्री.बाळासाहेब पटवर्धन यांचे जेष्ठ चिरंजीव रामराजे बाळासाहेब पटवर्धन यांचे नुकतेच अल्पश: आजाराने निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्गती देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.सुरेश देवाप्पा आवटी

अनुमोदक :- मा.किरण रामचंद्र सुर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १२/०७/२०१२

महासभा क्रमांक :- ०४

ठराव क्रमांक :- ६७

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

मुंबई येथे मंत्रालयात लागलेल्या भिषण आगीमध्ये मंत्रालयातील कर्मचारी व नागरीक मृत पावले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्गती देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.सुरेश देवाप्पा आवटी

अनुमोदक :- मा.किरण रामचंद्र सुर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १२/०७/२०१२

ठराव क्रमांक :- ६२

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

बारामती निरा रोड येथे झालेल्या अपघातामध्ये वारकरी मृत पावले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत आहे. ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो व सद्गती देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.सुरेश देवाप्पा आवटी

अनुमोदक :- मा.किरण रामचंद्र सुर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रभारी अधिकारी

नगर सचिव,
सांगली मिरज आ ण कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १२/०७/२०१२

ठराव क्रमांक :- ६३

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

.सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे माजी महापौर श्री.सुरेश आदगोंडा पाटील यांची लठ्ठे एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष पदी निवड झाली. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.सुरेश आदगोंडा पाटील यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.हरिदास पंडित पाटील

अनुमोदक :- मा.पुष्पा विलास सोनवळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी.

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १२/०७/२०१२

महासभा क्रमांक :- ०४

ठराव क्रमांक :- ६४

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचे ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सदस्या सौ.विमल पांडूरंग हिप्परकर यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री.विशाल पांडूरंग हिप्परकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस सरचिटणीस पदी निवड झाल्याबद्दल त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.विशाल पांडूरंग हिप्परकर यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किरण रामचंद्र सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.शितल जिनगोंडा पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रभारी अधिकारी

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १२/०७/२०१२

महासभा क्रमांक :- ०४

ठराव क्रमांक :- ६५

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (नगररचना मिरज) यांचे दि.२९/०६/२०१२ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

महानगरपालिकेच्या मिरज शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजना / महानगरपालिकेच्या प्रारुप विकासयोजना आणि भागश: अंतीम मंजूर विकास योजनेनुसार गांधी चौक ते शास्त्री चौक, विद्यमान शिवाजी रोड २४.४८ मी. रस्ता रुंदीकरणाने प्रस्तावीत आहे. सदर रस्त्यापैकी हिरा हॉटेल चौक ते गांधी चौक रस्ता रुंदीकरण प्रस्ताव अंमलबजावणीचे काम हाती घेण्यात आलेले आहे. सदर रस्त्याने बाधीत पश्चिम बाजूकडील बहुतांश मिळकतधारकाने रस्ता रुंदीने बाधीत क्षेत्राची कब्जेपट्टी चटई क्षेत्र निर्देशांक / विकसन हक्क घेणेचे अटीवर महानगरपालिकेस करुन दिलेली आहे. त्यानुसार जागेवर विद्यमान बांधकाम कुंपन भिंतीचे बांधकाम काढून घेणेत आलेले आहे. सदर रस्त्यापैकी अंतीम भूखंड ४२/३९ ही मिळकत जिल्हा परिषद सांगली यांचे मालकीची असून, सदर मिळकती पैकी रस्ता रुंदीने बांधीत २७६.१८ चौ.मी. क्षेत्रासाठी रु.१०,०८,०५७/- आणि त्यामधील विद्यमान छ.शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा , कुंपन भिंती , सायकल स्टँड, वॉचमन रुम इ. बाधीत क्षेत्रासाठी रुपये ८,५०,०००/- अशी एकूण नुकसान भरपाई रु.१८,५८,०५७/- मिळणे बाबत महानगरपालिकेस कळविले आहे. सन २०११ च्या बाजारमुल्य दर तक्त्यानुसार अंतीम भूखंड क्र.४२ पैकी चक्कर सडकेस सन्मुख असलेला भाग या मुल्य दर विभागातील (१९/१५७) खुल्या जमिनीचा प्रति चौ.मी. दर ३,६५०/- प्रमाणे खुल्या जागेचा दर आहे. त्यानुसार रस्ता रुंदीने बाधीत निव्वळ भुखंडासाठी व बांधकामासाठी नुकसान भरपाई रक्कम खाजगी वाटाघाटीने रस्ता क्षेत्र व बांधीव क्षेत्र भूसंपादन व नुकसान भरपाई आदा करणेस मान्यता देणे बाबतच्या विषयावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा होवून ही सभा खालील प्रमाणे घेत आहे.

मिरज येथील शिवाजी रोड जिल्हापरिषदेच्या मालकीच्या अ.भू.क्र.४२/३९ मधील मंजूर विकास योजना नुसार ८० फुट रस्ता रुंदीने बाधित क्षेत्राची भूखंडाची नुकसान भरपाई खाजगी वाटाघाटीने रस्ता क्षेत्र भूसंपादन करुन अदा करणेस ही सभा सहमती दर्शवित असून, या जागेमधील छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा,सायकल स्टॅन्ड,वॉचमन रुम इत्यादी बांधकामासाठी जिल्हा परिषद/पंचायत समिती यांनी रितसर परवानगी घेतली आहे अगर कसे? याची प्रशासनाने तपासणी करावी असे ही सभा आदेशित करीत आहे. तसेच, बांधकामासाठी परवानगी घेतली नसल्यास बांधकामासाठीची नुकसान भरपाई देता येणार नाही असे या सभेचे मत असल्याने बांधकामाची नुकसान भरपाई वजा करुन तसेच जिल्हापरिषद/ पंचायत समिती कडील महापालिकेची घरपट्टी तसेच, पाणीपट्टी अथवा अन्य कोणती येणेबाकी असल्यास ती वजावट करुन रस्ता रुंदीने बाधित नुकसान भरपाई आदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- S. H. [illegible]

अनुमोदक :- [illegible]

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

स.स.न.र.

नगर सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १२/०७/२०१२

ठराव क्रमांक :- ६६

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (सहा.संचालक नगररचना) यांचे दि.०५/०६/२०१२ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) (कक) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेल्या सुचनेनुसार मंजूर विकास योजना, मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील फेरबदलाचा प्रस्ताव राज्यातील महानगरपालिकांच्या विकास नियंत्रण नियमावलीत आर्थिक दृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न गटाच्या घरबांधणीसाठी करावायाच्या तरतूदीबाबत महासभेचे मत व अहवाल मा.शासनाकडे सादर करण्यास धोरणात्मक मान्यता देणे बाबतच्या विषयावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका ही ड वर्ग महापालिका असून, महापालिकेत कुपवाड (नगरपालिका) व वानलेसवाडी या ग्रामपंचायतीचा समावेश असलेने तसेच ही महापालिका अद्याप बाल्यावस्थेत आहे. अजून देखील बराचसा भाग महापालिकेसारखे विकसीत झालेला नसलेने नागरीकांनी अजूनही आपण महापालिका क्षेत्रात राहत असलेबद्दल स्वत:ची मानसिकता तयार केलेली नाही. याचाच परिणाम म्हणून महापालिकेत विस्तारीत भागात ज्या वेगाने निवासी प्रकल्प विकसीत होणे अपेक्षित होते तसे झाले नाही त्यामुळे एखादीही स्किम नाव घेण्यासाठी आढळून येत नाही. उलट विस्तारीत भागात अशा योजनांना संधी व जागा उपलब्ध असतानाही अलीकडील काळात गुंठेवारीचे प्रमाण वाढले असून, नियोजनाशिवाय वाढलेल्या या वस्त्यांमुळे मोठे नागरी प्रश्न निर्माण झाले आहेत. अशा स्थितीत एखादा निवासी प्रकल्प विकसीत करणेसाठी विकसनकर्ते पुढे येण्यास धजावत आहेत. त्यातुनही एखाद्या विकसनकर्त्याने असे धाडस दाखविलेच तर उक्त प्रस्तावाप्रमाणे त्यातील २०% जागा किंवा बांधीव सदनिका या अल्प उत्पन्न गटातील लोकांना देणे शक्य होणार नाही. तसेच सर्व साधारण उत्पन्न गटातील लोक अशा प्रकल्पात सहभागी होताना आपल्या सम उत्पन्न गटातील लोकांच्या बरोबर राहणे पसंत करतील मात्र काही प्रमाणात अल्प उत्पन्न गटातील लोक अशा प्रकल्पात येत आहेत. असे निदर्शनास येताच राहणीमानातील फरक लक्षात घेवून लोक अशा प्रकल्पांना प्रतिसाद देणार नाहीत. परिणामी महानगर विकासाच्या दृष्टीकोनातून असे प्रकल्प जर कार्यान्वित झाले नाही तर विस्कळीत व नियोजन शुन्य वस्त्या यांची वाढ होवून भविष्यातही गंभीर परिस्थिती निर्माण होईल. म्हाडाने महापालिका क्षेत्र किंवा अजूबाजूचे क्षेत्रात अल्प उत्पन्न गटातील लोकांसाठी आरक्षित असणाऱ्या जमीनी किंवा बांधकामे केलेली नाहीत कारण प्रत्यक्षात असे प्रकल्प पूर्ण केलेनंतर संबंधीत गटातील लोकांकडून प्रतिसाद मिळाला नसलेचा अनुभव येत आहे. सद्यस्थितीला शासनाकडून अभिप्रायात आलेला विकास नियंत्रण नियमावलीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्पउत्पन्न गटाच्या घरबांधणीसाठी करावयाच्या तरतुदीबाबत सकारात्मक भूमिका घेणे उचित होणार नाही व विकास नियंत्रण नियमावलीत असा फेरबदल करणेस यासभेचा विरोध आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज व कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १२/०७/२०१२

महासभा क्रमांक :- ०४

ठराव क्रमांक :- ६७.

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची मा.मकरंद सुधाकर देशपांडे स्थायी समिती, सभापती यांनी दिलेली सूचना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचाऱ्यांना जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी निवडणुक कार्यक्रम/जनगणना/केबल सर्व्हे/गॅस सर्व्हे/स्पर्धा परिक्षा/ओळखपत्र वाटप इ.कामासाठी अधिगृहीत केले जातात. या कामासाठी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना आदेश काढून सक्तीने घेतले जाते. त्यामुळे मनपाच्या दैनंदिन कामाकाजावर विपरीत परिणाम होत असतो. तसेच महापालिकेच्या घरपट्टी, पाणीपट्टी, जकात, मालमत्ता कर वसुली यासह प्रशासकीय कामकाजावरती विपरीत परिणाम होत आहे. महापालिकेचे अधिकारी /कर्मचारी जिल्हा प्रशासनाच्या सर्व्हे साठी गेल्यामुळे नागरी सुविधांची कामे रखडली जातात व महापालिकेचे कामकाज ठप्प होत असते. कर्मचाऱ्यांअभावी नागरीकांना सुविधा न मिळाल्यास त्याबाबत तक्रारी वाढतात. आत्यावश्यक सेवा व आपतकालीन सेवेवर त्याचा परिणाम होतो. तसेच शासन निर्देशानुसार जी कामे महापालिकेला वेळेत पूर्ण करण्याचे आदेश असतात, ती कामे कर्मचाऱ्यांअभावी वेळेत होत नसलेने प्रशासकीय अडचणी निर्माण होत असतात. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करुन फक्त निवडणुक व जनगणना हे राष्ट्रीय कार्यक्रम वगळता इतर सर्व्हेच्या व अन्य कामासाठी महापालिकेचे अधिकारी / कर्मचारी जिल्हा प्रशासनाकडे पाठविणेत येवू नयेत असे ही सभा आदेशित करीत असून, तसा अहवाल प्रशासनाने मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावा असे ही सभा सूचित करीत आहे.

सूचक :

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :-

प्रशासन अधिकारी (अस्था)

सदरचा ठराव मा.आयुक्तांचे निर्देशानुसार अंतिम मान्यतेस्तव.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.